महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग
मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101
दुरध्वनी क्र. : 0253-2461439 Email : dycomplan.nashik@maharashtra.gov.in
विभागाचे नाव : नियोजन शाखा संकलन : कुंभमेळा

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

विषय:- त्र्यंबकेश्वर शहर आणि परिसरातील धार्मिक कॉरीडॉर आणि इतर विकासकामांबद्दल दिनांक 15/03/2025 रोजी दुपारी 2.00 वा. जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन दिनांक 15, मार्च 2025 रोजी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली त्र्यंबकेश्वर शहर आणि परिसरातील धार्मिक कॉरीडॉर आणि विकासकामांबद्दल बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. विभागीय आयुक्त महोदय यांचे सूचनेनुसार इतिवृत्त आपले कार्यालयाचे स्तरावर सर्व संबंधित कार्यान्वयीण यंत्रणांना निर्गमित करण्यात येवून इतिवृत्तात नमुद केल्याप्रमाणे त्या-त्या विभागाशी संबंधीत असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. ही विनंती.

आपला विश्वासू,

सोबत. बैठकीचे इतिवृत्त.

Signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 18-03-2025 12:37:44
(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक

# इतिवृत्त

त्र्यंबकेश्वर शहर आणि परिसरातील धार्मिक कॉरीडॉर आणि इतर विकासकामांबद्दल दिनांक 15/03/2025 रोजी दुपारी 2.00 वा. जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीला पुढील अधिकारी उपस्थित होते.

1. श्री. जलज शर्मा, जिल्हाधिकारी, नाशिक
2. श्रीमती देवचक्के, मुख्याधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद व त्यांचे कन्स्लटंट
3. श्रीमती रितू शर्मा, इन्टॅक नाशिक व त्यांचे सहकारी

बैठकीमध्ये सविस्तर चर्चा झाल्यानंतर पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| 1 | कुंभमेळयाच्या दृष्टिने त्र्यंबकेश्वरच्या पाणी पुरवठा योजनेचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करावे आणि त्याच्या प्रशासकीय मान्यतेची प्रक्रीया करावी. | नप त्र्यंबकेश्वर |
| 2 | त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्र आराखडयासाठी पुढील महत्वाचे घटकांबद्दल चर्चा झाली.<br>1. त्र्यंबकेश्वरचे मुख्य मंदीर<br>2. कुशावर्त तीर्थ<br>3. दर्शनपथ<br>4. त्र्यंबकेश्वरची इतर मंदीरे<br>5. त्र्यंबकेश्वरचे इतर कुंड<br>6. नदीकाठी व इतरत्र विविध पादचारी मार्ग (trails) आणि ब्रम्हगिरी परिक्रमा<br>7. महाव्दार<br>8. स्वच्छतागृहे<br>9. कुशावर्त ते त्र्यंबकेश्वर मंदीर बंदीस्त गोदावरी नदीच्या पुनरुज्जीवनाचा आराखडयाचा विचार करणे.<br>वरील पैकी त्र्यंबकेश्वर प्रमुख मंदीर, कुशावर्त, दर्शनपथ, इतर मंदीरे, इतर कुंड आणि ब्रम्हगिरी परिक्रमा यांचे निविदा प्रसिध्द करण्यासाठी आवश्यक असणारे सविस्तर आराखडे तयार करावेत. त्याचप्रमाणे इतर सर्वांचे ढोबळमानाने आराखडे अंतिम करावेत. | नप त्र्यंबकेश्वर |
| 3 | पंचायत समिती व इतर शासकीय कार्यालये इतरत्र स्थलांतरीत करण्यासाठी दोन पर्यायांची चर्चा झाली.<br>i. महादेवी संस्थानची जागा- याकरिता आरक्षण बदल करणे किंवा / आणि अकोमोडेशन रिजर्वेशनची प्रक्रीया करणे आवश्यक वाटते. त्याचा प्रस्ताव येत्या शुक्रवार दिनांक 21/03/2025 पर्यंत तयार करावा.<br>ii. पर्यायाने सार्वजनिक बांधकाम विभागाचे सध्याचे कार्यालय/ स्टोअर हायवेलगत आहे. त्याठिकाणी सर्व कार्यालये स्थलांतरित करावीत. याचाही प्रस्ताव त्याचवेळी तयार करावा. | जिल्हाधिकारी<br>सार्वजनिक बांधकाम विभाग<br>नप त्र्यंबकेश्वर |
| 4 | ग्रामीण रुग्णालय त्र्यंबकेश्वर यांना भविष्यात बाहेर मोठया जागेत स्थलांतरित करावे त्याकरिता | जिल्हाधिकारी<br>जिल्हा शल्य चिकित्सक<br>नप त्र्यंबकेश्वर |

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| | i. ग्रामीण रुग्णालय त्र्यंबकेश्वरच्या नविन बांधकामाचा प्रस्ताव शासनाला सादर करावा- त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांशी समन्वय साधून उचित कार्यवाही करावी.<br>ii. ग्रामीण रुग्णालय स्थलांतरीत करण्यासाठी बिल्वतीर्थ जवळील रस्त्याच्या जवळची मंदीर संस्थानची जागा योग्य राहील त्याकरीता मंदीर संस्थानशी चर्चा करावी. | |

याबाबतची पुढील बैठक लवकरच घेण्यात येईल असे शेवटी अध्यक्षांनी सांगितले आणि बैठक समाप्त करण्यात आली.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 17-03-2025 18:15:05
(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती,
तथा विभागीय आयुक्त, नाशिक.